- स्वामी समर्थ सेवा सहकारी संस्था मर्या.

— चेंबूर, मुंबई

# उपविधी

(सूचना :- या उपविधीत केलेला 'अधिनियमांचा' व 'नियमांचा' उल्लेख हा अनुक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 व त्या अन्वये केलेले नियम, 1961 यांचा आहे असे समजावे.)

## प्रकरण एक : प्रारंभिक

## (सर्वसाधारण सहकारी संस्था )

**1. संस्थेचे नाव** स्वामी समर्थ सेवा सहकारी संस्था मर्यादित................ ता................ जि. मुंबई असा आहे व S. Loukar

तिचा नोंदणी क्र. [illegible] दि. २९/०८/२०१२ असा आहे.
११०९० / २०१२-१३ / सन २०१२

**2. संस्थेचा नोंदविलेला पत्ता**

[illegible] को-ऑप हौसिंग सो. लि. ४-६०४.

घाटकोपर - मानखुर्द लिंक रोड, मुंबई - ४०० ०४३ S. Loukar

असा आहे. संस्थेच्या पत्त्यातील होणारा बदल अधिनियमातील कलम 37 व नियम 31 मधील तरतुदींनुसार निबंधकांना कळविला जाईल व निबंधकाच्या मंजूरीनंतरच तो बदल नोंदविला आहे असे समजण्यात येईल.

**3. संस्थेचे वर्गीकरण :-**

(1) संस्थेचे वर्गीकरण ***"सर्वसाधारण संस्था" व*** उपवर्गीकरण ***"इतर संस्था"***

S. Loukar

***असे राहील.***

(2) संस्थेचे आर्थिक वर्ष '1 एप्रिल ते 31 मार्च ' असे राहील.

(3) संस्थेचे कामकाज तिचे पोटनियम, अधिनियम व नियम यांचे योग्य पालन करुन केले जाते किंवा कसे, कागदपत्रे आणि हिशोब पुस्तके योग्य नमुन्यात ठेवली आहेत कायं, संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्त्वावर चालतो का, संस्था सहकारी तत्त्वांचे आणि अधिनियमांच्या तरतुदींनुसार आणि त्या अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमानुसार राज्य सरकारने दिलेल्या निर्देशक तत्त्वांचे किंवा आदेशांचे पालन करत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी निबंधकांने अगर त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने संस्थेच्या कामकाजाची तपासणी करणे हे कायदेशीर असेल.

**4. संस्थेचे कार्यक्षेत्र** - ......मुंबई पुर्व उपनगर......................................... असे राहील.

**5. संस्थेचे उद्देश** पुढीलप्रमाणे असतील-

(1) भविष्यनिर्वाह निधीची योजना करुन सदस्यांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार होण्यासाठी उत्तेजन देणे.

(2) संस्थेच्या व सदस्यांच्या गरजा भागविण्याकरिता उपविधी क्रमांक 6 मध्ये नमूद केलेल्या साधनांनी भांडवल जमा करणे.

(3) सदस्यांच्या करिता सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांची अंमलबजावणी करणे. हयात विमा, अपघाती विमा, पेन्शन व उपदान इत्यादी तरतूद येऊ शकते.

(4) समाज विघातक रुढींना आळा घालणे आणि सदस्यांची नैतिक, सामाजिक व आर्थिक उन्नती करणे.

(5) संस्थेच्या कामकाजासाठी तज्ज्ञ अधिकारी, कामगार व नोकर नेमणे, त्यांचे नियंत्रण करणे व जरुरीनुसार त्यांना कमी करणे.

(6) संस्थेच्या सभासदांना, संचालकांना, तसेच कर्मचा-यांना सहकार प्रशिक्षण देणे व त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतुद करणे.

(7) संस्था सदस्यांच्या आर्थिक, सामाजिक व सर्वसाधारण प्रगतीसाठी आवश्यक असणा-या सेवा सुविधा पुरविणे. त्याकरिता आवश्यक असणारी अनुषंगिक कार्ये निबंधकाच्या पुर्वपरवानगीने हाती घेणे.

(8) केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था

(9) यांनी हाती घेतलेले उपक्रम राबविणे.

(10) ----------

(11) ----------

(12) ----------

**6. खालील साधनांनी संस्थेसाठी भांडवल जमा केले जाईल -**

(1) भागरुपाने (अ) सभासदांकडून (ब) शासनाकडून किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत अगर इतर वित्तीय संस्थांमार्फत.

(2) सभासदांकडून ठेवी घेऊन.

(3) कर्ज रुपाने,

(4) देणग्या व मदत घेऊन.

(5) प्रवेश फी आकारुन.

वरील 2, 3 व 4 या साधनांनी जमविण्यात येणारे भांडवल हे निबंधकाचे पुर्वपरवानगीशिवाय वसूल झालेले भागभांडवल, संचित राखीव निधी व इमारत निधी यांच्या बेरजेतून साचलेले तोटे वजा जाता राहीलेल्या रक्कमेच्या दहा पटीहून अधिक असणार नाही. संस्थेचे भांडवल तिच्या व सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता उपयोगात आणले जाईल. संस्थेचे भांडवल संस्थेच्या व्यवहारात गुंतवलेले नसेल तेव्हा अधिनियम कलम 70 अन्वये ते गुंतविले जाईल.

## प्रकरण दोन : सभासदत्व

7. खालील अटींना पात्र राहून ***संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणा-या व संस्थेच्या उद्देशाप्रमाणे कार्य करणा-या व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल.***

(1) ती व्यक्ती पूर्ण 18 वर्षे वयाची व करार करण्यासाठी लायक असली पाहिजे.

(2) तो चांगल्या वर्तणुकीचा असला पाहीजे.

(3) त्याची पत चांगली असली पाहिजे व त्याच्याकडे शासकीय थकबाकी नसेल किंवा त्याच्यावर दिवाणी कोर्टाचा हुकूमनामा झालेला नसला पाहिजे.

(4) निबंधकाने ठरविलेल्या नमुन्यात त्याने सभासदत्वाकरिता अर्ज दिला असला पाहिजे.

(5) संस्थेचे उद्देश त्यास समजलेले असले पाहिजेत.

(6) त्याचा सभासद होण्याबद्दलचा लेखी अर्ज संचालक मंडळातील हजर असणाऱ्या एकूण संचालकाच्या बहुमताने मंजूर केलेला असला पाहिजे.

(7) त्याने 100/- ***रुपये*** प्रवेश फी दिली असली पाहिजे.

(8) त्याने किमान एक तरी भाग घेऊन त्याची पूर्ण रक्कम भरलेली असली पाहिजे.

(9) अधिनियम, नियम व उपविधी यांतील अटी त्याने पूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

(10) उद्देशात नमूद बाबींशी सहसंबंध व्यक्त करणारा असला पाहिजे. त्यासाठी संस्थेच्या उद्देशाप्रमाणे आर्थिक संबंध व्यवहाराच्यारुपाने असला पाहिजे.

(11) सारखेच उद्देश असलेल्या दुसऱ्या सहकारी संस्थेचा तो सभासद नसला पाहिजे.

7. (अ) ***क्रियाशील सभासद म्हणजे ज्या सभासदाने मागील सलग पाच वर्षात किमान एका अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थिती व मागील सलग पाच वर्षात संस्थेच्या उद्देशात नमूद केलेल्या सेवा व सुविधांचा किमान 120 दिवस लाभ घेणारी किंवा आर्थिक व्यवहार करणारी व्यक्ती/संस्था ही क्रियाशील म्हणून संबोधली जाईल.***

**ब) अक्रियाशिल सभासद - जो सभासद वरील (अ) मधील तरतुदीची पुर्तता करित नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अक्रियाशिल सभासद म्हणून करण्यात येईल. परंतु असे वर्गीकरण केलेल्या सभासदाने वरील (अ) मधील तरतुदीची पुर्तता केल्यावर,तो क्रियाशिल सभासद म्हणुन**

त्याचे पुन:वर्गीकरण केले जाण्यास पात्र होईल.

दर आर्थिक वर्षाच्या अखेरीस समिती , क्रियाशिल सभासद म्हणुन पुन:वर्गीकरण केले जाण्यास पात्र ठरलेले अक्रियाशिल सभासद व क्रियाशिल सभासद म्हणुन पुन:वर्गीकरण केले जाण्यास अपात्र ठरलेले अक्रियाशिल सभासद यांचा आढावा घेवुन त्याची नोंद संबंधीत नोंदवहीमध्ये करेल.

ब-1) समिती दर आर्थिक वर्षाच्या अखेरीस असे वर्गीकरण करील व त्याची अक्रियाशिल सभासद झाल्याच्या दिनांकाची या करीता ठेवलेल्या नोंदवहीमध्ये नोंद करेल आणि समिती आर्थिक वर्षाच्या समाप्त होण्याच्या दिनांकापासुन तीस दिवसांच्या आत,संबंधीत सदस्याला,अशा वर्गीकरणाबाबत हस्ते वटवड्याने अगर नोंदणीकृत पोच देय डाकेने कळविल.

ब-2) अक्रियाशिल सभासद म्हणुन वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासुन पुढिल पाच वर्षामध्ये वरील अ मधील तरतुदींची पुर्तता केली नाही तर, असा कोणताही अक्रियाशिल सभासद अधिनियमाचे कलम 35 अन्वये त्याला काढुन टाकले जाण्यास पात्र ठरेल.

ब-3) क्रियाशिल सभासद किंवा अक्रियाशिल सभासद असण्याबाबत वाद उद्भवल्यास,अशा सभासदास, अधिनियमाचे कलम 26 मधील तरतुदीनुसार संस्थेच्या निबंधकाकडे विहीत मुदतीत अपील करता येईल.

8. (1) "नाममात्र सभासद" किंवा "सहयोगी सभासद" म्हणून एखाद्या व्यक्तिस त्याच्या लेखी अर्जावरुन अधिनियमातील कलम 24 व नियमामधील तरतुदीनुसार सभासद करुन घेता येईल. मात्र त्याने उपविधी क्रमांक 6 व 7 मधील अटी पूर्ण केल्या असल्या पाहिजेत. अशा सभासदांचे संस्थेशी होणारे व्यवहार व संस्थेतील त्यांचे अधिकार हे अधिनियम 24 व 27(8) मधील तरतुदींना अनुसरुन मर्यादित स्वरुपाचे असतील. या दोन प्रकारच्या सभासदत्वासाठी आलेले अर्जावर संचालक मंडळ निर्णय घेईल.

(2) मयत सभासदाचे भाग अगर हितसंबंध वारसाहक्काने मिळविणाऱ्या अज्ञान अगर वेडसर व्यक्ती यांना अनुक्रमे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अगर पालक यांच्या मार्फत नियम व उपविधी यानुसार हस्तांतर होतील अथवा प्राप्त होतील.

(3) उपविधी क्रमांक 7 मध्ये काहीही नमूद केले असले तरी राज्यशासन व केंद्र शासन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच वित्त पुरवठा करणा-या सहकारी संस्थांना या संस्थेचे सभासद होता होईल.

(4) एखादया अर्जदारास सभासदत्त्व नाकारल्यास असा निर्णय त्यास त्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे आत अगर सभासदत्वासाठी अर्ज केल्याचे तारखेपासून तीन महिन्याचे आत या पैकी जी मुदत कमी असेल त्या मुदतीत संस्थेने कळविला पाहीजे. सभासदत्त्वाचा अर्ज नाकारल्यास त्याविरुध्द अर्जदारास कलम 23 अन्वये निबंधकाकडे संस्थेच्या निर्णयाच्या दिनांकापासून

साठ दिवसाच्या कालावधीच्या आत अपील करता येईल.

(5) कोणतीही व्यक्ति संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहते किंवा नाही अथवा ती व्यक्ति एखादा व्यवसाय, धंदा करते अथवा नाही अथवा कलम 22(1अ) नुसार विशिष्ट वर्गात मोडते किंवा नाही अथवा त्या उपकलमानुसार अपात्रता धारण करते किंवा नाही याविषयी कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास कलम 11 अन्वये संबधित निबंधकास निर्णय देणेचा अधिकार राहील.

9. अधिनियमातील कलम 33 व 105 मधील तरतुदींना अधीन राहून सभासदाची जबाबदारी त्याने घेतलेल्या भागांच्या प्रमाणात राहील.

10. मक्त्याने घेतलेले काम पुरे होईपर्यंत अगर संस्थेला सभासदाच्या कामाची जरुरी असेल तर, कोणाही सभासदास आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देता येणार नाही.

11. कोणत्याही सभासदास एक महिन्याची लेखी नोटीस देवून राजीनामा देता येईल मात्र त्यापुर्वी त्याचेकडे येणे असलेल्या रक्कमांची वसूली झाली असली पाहीजे तसेच नियम 21 मधील व उपविधीतील तरतुदी राजीनामा मंजूर करताना विचारात घेतल्या जातील.

12. अधिमंडळ बैठकीस सभेत हजर असणाऱ्या व मताचा अधिकार असणाऱ्या सभासद संख्येच्या तीन चतुर्थांश सभासदांच्या मतांनी कोणत्याही सभासदास पुढीलपैकी कोणत्याही कारणास्तव काढून टाकता येईल.

(1) जर तो सभासदत्वाच्या अटी पाळीत नसेल.

(2) जर संचालक मंडळाच्या मते तो संस्थेच्या हिताविरुध्द काही कृत्ये करीत असेल अगर संस्था चालविण्यात अडथळे आणीत असेल.

(3) जर संचालक मंडळाच्या मते त्यांने संस्थेला बदनाम केले असेल.

(4) जर त्याचे दिवाळे निघाले असेल अगर तो कायद्याने लायक ठरत नसेल.

(5) त्याला अनैतिक स्वरुपाच्या फौजदारी गुन्हयाबद्दल शिक्षा झाली असेल.

(शिक्षा होऊन 5 वर्षे उलटल्यावर ही अपात्रता राहणार नाही).

(6) समितीने ठरविलेल्या कामाच्या प्रमाणापेक्षा तो कमी काम करीत असेल अगर संस्थेच्या कामात तो योग्य शिस्त पाळीत नसेल तर.

(7) संस्थेच्या उद्देशाप्रमाणे त्याने आर्थिक संबंध व्यक्त केला नसेल किंवा किमान आर्थिक व्यवहार केले नसल्यास किंवा अन्य मार्गाने तो अक्रियाशिल झाल्यास किंवा संस्थेच्या उद्देशाप्रमाणे सेवा सुविधांचा लाभ न घेतल्यास.

13. कोणत्याही सभासदास संस्थेतून काढून टाकताना अधिनियम कलम 35 व नियम 29 मधील तरतुदी विचारात घेतल्या जातील व त्यात नमूद केलेल्या कार्यरीतीचा अवलंब केला जाईल. काढून टाकलेल्या सदस्यास या तरतुदीनुसार पुन्हा ***एक वर्षानंतर सभासद करुन घेता येईल.***

14. खालीलपैकी कोणत्याही कारणामुळे एखाद्याचे सभासदत्त्व बंद होईल. एका सहकारी वर्षात संस्थेतील एकूण सभासदांपैकी 1/5 पेक्षा जास्त इसमांचे सभासदत्व बंद करता येणार नाही.

(1) त्याने सभासदाचा दिलेला राजीनामा मंजूर झाल्यास

(2) त्याच्या नावावरील सर्व भाग अगर हितसंबंध दुसऱ्याच्या नांवावर वर्ग झाल्यास.

(3) तो मयत झाला असल्यास.

(4) त्याला कायमचे वेड लागले असल्यास.

(5) तो कायमपणे संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर रहात असल्यास.

(6) संस्थेच्या उद्देशाप्रमाणे त्याने आर्थिक संबंध व्यक्त केला नसेल किंवा किमान आर्थिक व्यवहार केले नसल्यास किंवा अन्य मार्गाने तो अक्रियाशिल झाल्यास किंवा संस्थेच्या उद्देशाप्रमाणे सेवा सुविधांचा लाभ न घेतल्यास.

***15. संस्थेच्या सभासदास त्याने संस्थेशी केलेल्या व्यवहारासंबंधीची कागदपत्रे, लेखे व पुस्तके अद्यावत नोंदीसह त्या सभासदाने लेखी अर्ज दिलेनंतर त्यास संस्थेच्या कार्यालयीन वेळेत ते पाहता येतील किंवा मागणीप्रमाणे त्याच्या प्रती मिळतील.***

## प्रकरण तीन : भागभांडवल

**16.** प्रत्येक भागाची दर्शनी किंमत **रु.** *100/-* राहील. एकूण भाग भांडवलाची कमाल मर्यादा अक्षरी रुपये एक लाख फक्त. (अधिकृत भागभांडवल) रु.100,000/-. राहील. तसेच एकूण भागांची संख्या 1000 राहील.

17. संस्थेच्या एकूण भागांच्या एकपंचमांश भागापेक्षा किंवा जास्तीत जास्त ***वीस हजार रुपयांपेक्षा*** *यापैकी जे कमी असेल त्यापेक्षा* जास्त किंमतीचे भाग

कोणाही सभासदास धारण करता येणार नाहीत अगर त्यावर हक्क सांगता येणार नाही.

18. जादा भागाकरिता केलेले अर्ज लेखी असले पाहिजेत व संचालक मंडळाकडून अशा अर्जांचा निकाल केला जाईल.

19. अधिमंडळ बैठक ठरवील त्याप्रमाणे प्रत्येक सभासदाने वर्गणी दिली पाहिजे.

टीप :- अशा रीतीने जमा झालेली वर्गणीची रककम प्रत्येक सभासदाच्या नावे ***दोनशे*** भागांच्या रक्कमेपर्यंत भागापोटी जमा केली जाईल व त्यापुढे जमा होणारी रक्कम संचित ठेव (Cumulative Deposit) ठेव म्हणुन जमा राहील. अशा प्रकारे ठेव रुपाने जमा होणा-या रक्कमेवर अधिमंडळ बैठक ठरविल त्या दराने व्याज देता येईल.

20. सभासदाने घेतलेल्या भागाचा त्यास संस्थेने त्वरीत भाग दाखला दिला पाहीजे.

21. भागाचे हस्तांतरण अधिनियम कलम 29 व 30 व नियमामधील तरतुदींनुसार केले जाईल. संचालक मंडळाच्या मंजुरीने दुसऱ्या सभासदास अगर ज्याचा सभासदत्वाचा अर्ज संचालक मंडळाने मंजूर केला असेल अशा व्यक्तिच्या नावे तो भाग हस्तांतरीत करता येईल. प्रत्येक भाग हस्तांतरीत करण्याकरीता 10/- रुपये फी आकारली जाईल. ज्याचे नावे भाग हस्तांतरीत केला त्याचे नाव भागांच्या हस्तांतरण नोंदवहीत दाखल केल्याखेरीज व हस्तांतरीत करणाऱ्याने आपली संस्थेची देणी भागविल्याखेरीज भागांचे

हस्तांतरण पूर्ण होणार नाही. शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत खरेदी केलेले भाग हस्तांतरीत करताना हे निर्बंध लागू असणार नाहीत.

22. कोणाही सभासदास नामनिर्देशन, नियमास अनुसरुन करता येईल. संस्थेने अशा प्रकारचे नामनिर्देशन विहित पध्दतीने संस्थेच्या दप्तरी नोंदले पाहीजे. सभासदाने नामनिर्देशन करताना अर्जासोबत रु. 10/- इतकी फी भरली पाहिजे.

23. एखाद्या सभासदाच्या मृत्यूनंतर त्याचे भाग अगर हितसंबंध त्याने नेमलेल्या वारसदारांच्या नावे वर्ग केले जातील; असा वारसदार नेमला नसेल तर त्याचे भाग अगर हितसंबंध, अधिनियम कलम 30 व नियम 25 मधील तरतुदींनुसार त्याच्या वारसाच्या अगर कायदेशीर प्रतिनिधीच्या नावे हस्तांतरीत केले जातील. मात्र हस्तांतरण करण्यापूर्वी त्या नेमलेल्या वारसास अगर कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचे सभासद करुन घेतले जाईल. त्याकरिता संस्थेने ठरविलेल्या नमुन्यांत त्याने अर्ज केला पाहिजे. सभासदाकरिता त्याला पुन्हा भाग विकत घेण्याची जरुरी नाही.

24. एखाद्या सभासदाच्या मृत्यूनंतर त्याच्या खात्यात असलेल्या भागांच्या किंवा हितसंबंधाच्या रक्कमेतून संस्थेस त्याच्याकडून जे येणे असेल ते वजा करुन उरलेली रककम त्याने नेमून दिलेला वारसदार अथवा वारसदार नेमला नसेल तर संचालक मंडळाच्या मते मयताचा जो कोणी योग्य वारस अगर कायदेशीर प्रतिनिधी असेल त्याच्याकडून योग्य त्या प्रमाणात नुकसान भरपाईचा रोखा (a bond of indemnity) लिहून त्याने मागणी केल्यापासून सहा महिन्यांच्या आत, अधिनियम कलम 29 (3) व नियम 21 मधील तरतुदीप्रमाणे दिली जाईल.

25. सभासदत्वातून कमी झालेल्या व्यक्तीस तो कमी झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, त्याच्या भागांची रक्कम त्याला दिली जाईल; मात्र त्याच्याकडून येणे असलेल्या रक्कमा, त्या भागांच्या रक्कमांतून कापून घेतल्या जातील. तसेच कोणत्याही वर्षात परत करावयाचे भागभांडवल हे त्यापूर्वीच्या ***31 मार्च*** रोजी असलेल्या संस्थेच्या एकूण भागभांडवलाच्या 10% पेक्षा जास्त असणार नाही.

26. संस्थेने जर शासकीय अगर वित्त पुरविणा-या सहकारी बँकेचे कर्ज घेतले असेल तर, अनुक्रमे संबधित निबंधक अगर अशी बँक यांच्या पूर्व संमतीशिवाय संस्थेस कोणत्याही भागांची रक्कम परत करता येणार नाही.

टीप - उपविधी क्रमांक 24 व 25च्या कारणासाठी भागांची रक्कम परत करताना भागांची किंमत नियम 23 मधील तरतुदीनुसार केली जाईल व भागाची रक्कम देताना तीच विचारात घेतली जाईल.

## प्रकरण चार : अधिमंडळाची वार्षिक बैठक

27. संस्थेच्या अधिमंडळाची वार्षिक बैठक ही संस्थेची ***सर्वोच्च सत्ता राहील;*** पण ती सत्ता अधिनियम, नियम, उपविधी यांतील तरतुदींना अधिन राहील.

28. संस्थेची पहिली अधिमंडळाची वार्षिक बैठक नियमामधील तरतुदीनुसार भरविली जाईल व त्या सभेत त्याच तरतुदीनुसार कामे केली जातील.

29. दरवर्षी आर्थिक वर्ष संपलेनंतर म्हणजेच 31 मार्चनंतरच्या ***30 सप्टेंबर पूर्वी***

*(सहा महिन्याच्या आत)* अधिनियम कलम75 व नियमामधील तरतुदींनुसार अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावली जाईल.

30. अधिमंडळाची वार्षिक बैठकीत करावयाच्या कामात खालील कामांचा समावेश होतो -

(1) संस्थेचा गतवर्षीचा अधिनियम कलम 75 मधील तरतुदीनुसार तयार केलेला वार्षिक अहवाल व नियमामधील तरतुदीनुसार तयार केलेली त्या वर्षाची एन नमुन्यात तयार केलेली आर्थिकपत्रके स्वीकारणे व ती नफ्याच्या विभागणीसह मंजूर करणे अगर त्यात जरुर वाटतील त्या दूरुस्त्या करुन त्याला मंजुरी देणे.

(2) उपविधीमधील मर्यादेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे.

(3) अहवाल वर्षापाठीमागील वर्षाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

(4) अहवाल वर्षातील वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.

(5) चालू आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य तालिकेवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे. मात्र अशा त्याच लेखापरिक्षकाची नियुक्ति सलग कमाल तीन वर्षासाठीच करता येईल.

(6) निबंधकास सादर केलेल्या/करावयाच्या वार्षिक विवरण पत्रकांची नोंद घेणे.

(7) संस्थेच्या होणा-या/घ्यावयाच्या पंचवार्षिक निवडणुक तारखेची नोंद घेणे.

(8) सभासदांच्या अंतर्गत तक्रारी अथवा वाद निवारण करणेसाठी तीन जेष्ठ,

अनुभवी व क्रियाशिल सभासदांची तक्रार निवारण समिती नियुक्त करील. मात्र अशा समितीचे सदस्य म्हणुन विद्यमान संचालक मंडळापैकी कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही.

(9) उपविधीप्रमाणे जरुरीनुसार सभासदांना संस्थेतून काढून टाकणेबाबत निर्णय घेणे.

(10) संस्थेच्या उपविधीमध्ये आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करणे.

(11) सभासदांना व संचालक मंडळ सदस्य यांना वेळोवेळी दिल्या जाणा-या आगाऊ रक्कमा (ऍडव्हान्सेस) देण्याविषयी संचालक मंडळाने तयार केलेल्या विनियमांना मंजुरी देणे.

(12) सभासदांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी व अंतर्गत वादाचा निपटारा करण्यासाठी अधिमंडळाची वार्षिक बैठकीत नियुक्त केलेल्या तक्रार निवारण समितीकडे अशा तक्रारी सादर करेल व अशा समितीची सभा घेण्याची तजवीज करेल. यासाठी संचालक मंडळाला विशेष अधिकार राहतील मात्र अधिमंडळाची वार्षिक बैठकीमध्ये विहीत पध्दतीने याबाबत कार्यवाही करणेत येईल.

**31.** संस्थेचे कामकाज तसेच उद्देशानुसार तत्सम व्यवहारांची व्यवस्था पाहण्यासाठी एक स्वतंत्र उपसमिती राहील. संस्थेच्या संचालक मंडळाचा अध्यक्ष व तिचा एक संचालक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा प्रतिनिधी (बँकेचे कर्ज घेतलेले असल्यास) असे या उपसमितीचे अधिकारपरत्वे (एक्स ऑफिशिओ) सभासद असतील.

32. अधिनियम कलम 76 मधील तरतुदीनुसार संस्थेला अधिमंडळाची विशेष बैठक बोलाविता येईल व त्याच तरतुदीनुसार ती बोलावली जाईल व खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलाविलीच पाहिजे.

(1) संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या एक पंचमांश सभासदांनी लेखी मागणी केल्यास.

(2) निबंधकाने तशी सूचना केल्यास.

(3) संघीय संस्थेच्या समितीने तशी सूचना केल्यास.

33. अधिमंडळाची वार्षिक बैठकीची कार्यपध्दती नियम 60 मधील तरतुदीनुसार राहील.

34. अधिमंडळाची वार्षिक बैठकीची चौदा दिवसांची व अधिमंडळाची विशेष बैठकीची सात दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या व्यवस्थापकाने ती सभा बोलाविली पाहिजे. अशा सभेची सूचना निबंधकाना दिली पाहिजे. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका संस्थेच्या नोटीस बोर्डावर डकवून ती प्रसिध्द केली पाहिजे. नोटिशीत सभेची तारीख व निश्चित वेळ नमूद केली पाहिजे. संस्थेचा अध्यक्ष व त्याचे गैरहजेरीत संचालक मंडळातील एक संचालक व व्यवस्थापक यांनी नोटिशीवर सहया केल्या पाहिजेत.

35. कोणत्याही अधिमंडळाची बैठकीत एकूण सभासद संख्येच्या दोन पंचमांश अगर 25 (यापैकी जी संख्या कमी असेल तितके) सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजले जाईल. बैठकीस गणपूर्ती झाली नसेल तर,

ती बैठक सात दिवसांपर्यंत पुढे ढकलली जाईल. मात्र अशा बेठकीस गणपूर्ती असो वा नसो, बैठकीचे कामकाज पुर्ण केले जाईल. परंतु त्या बैठकीत विषयपत्रीकेतील सर्व विषय न संपल्यास त्या बैठकीच्या तारखेपासून पुढे 30 दिवसांच्या आत पुन्हा बैठक घेवून उर्वरीत विषयांचे कामकाज पुर्ण करणेत येईल.

36. संस्थेचे अध्यक्ष हे अधिमंडळ बैठकीचे अध्यक्ष असतील. त्यांच्या गैरहजेरीत बैठकीसाठी अध्यक्षाची निवड अधिमंडळ बैठक करेल.

37. अधिनियम कलम 27 व नियम 60 मधील तरतुदींनुसार अधिमंडळच्या बैठकीत मतदान केले जाईल. बैठकीस हजर असणाऱ्या प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार राहील. ***परंतु थकबाकीदार सभासदांस मतदानाचा अधिकार असणार नाही.*** अध्यक्षास इतर पात्र सभासदाप्रमाणे एक मत असेल. परंतु एखाद्या ठरावावर मतदान सारखेच विभागले गेल्यास मात्र अध्यक्षास जादा एक निर्णायक मत असेल. एखाद्या ठरावावर (मतैक्य न झाल्याने) सभासद विभागले गेले असतील तेव्हा, मतदान करणाऱ्या कोणाही सभासदास मतमोजणी (पोल) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्षाने ती मंजूर केली पाहिजे.

38. कोणत्याही पास झालेल्या ठरावात बदल करण्यासंबंधीचा ठराव अधिमंडळाच्या बैठकीत पास झालेल्या मूळ ठरावाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत निबंधकाच्या परवानगीशिवाय कोणत्याही अधिमंडळाच्या बैठकीत आणता येणार नाही.

39. खाली दिलेल्या संस्थांना सामील होऊन संस्थेने त्यांचे सभासदत्व पत्करले पाहिजे -

1) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

2) जिल्हा स्तर संघीय सहकारी संघ

3) विभागस्तर संघीयसहकारी संघ

संस्था ज्या इतर संस्थांची सभासद झाली असेल अशा संस्थांच्या अधिमंडळाच्या बैठकांना संस्थेतर्फे प्रतिनिधीला हजर राहता येईल. अधिनियम कलम 27 मधील तरतुदींना अधीन राहून संस्था वेळोवेळी प्रतिनिधी ठरवील.

40. व्यवस्थापकाने अधिमंडळाच्या बैठकाचा वृत्तांत नोंदवहीत लिहून ठेवला पाहिजे.

## प्रकरण पाच - संचालक मंडळ

41.अ) संस्थेच्या ***संचालक मंडळाने संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात तेरा संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे पाच वर्षे इतका राहील. तसेच संस्थेच्या पदाधिका-यांचा कालावधी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील.***

**संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील**

***(1) सर्वसाधारण*** *- 8*

***(2) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती*** *- 1*

(3) विमुक्त जाती भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग - 1

(4) इतर मागासवर्गीय -1

(5) महिला -2

एकूण -13

वरील संचालक पदे संस्थेच्या सभासदामधून निवडणूकीव्दारे भरली जातील. संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक ही राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल.

ब) याशिवाय संस्थेचे व्यवस्थापक हे कार्यलक्षी संचालक (Functional Director) म्हणून संचालक मंडळावर कार्यरत राहतील. या व्यतीरिक्त संचालक मंडळ एका तज्ञ संचालकाची(Expert Director) संचालक मंडळावर स्विकृती करेल. सदरचे दोन संचालक उपविधी क्र. 41 अ मध्ये नमूद असलेल्या एकूण संचालक संख्येपेक्षा अतिरिक्त असतील. या दोन्ही संचालकांना संचालक मंडळ सभेमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही अथवा त्यांना पदाधिकारी होता येणार नाही.

42. संचालक मंडळात रिक्त होणा-या जागा कायद्यातील तरतुदीप्रमाणे भरता येतील.

43. योग्य कारण दाखविल्यावाचून संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास असा संचालक, संचालक मंडळातून कमी करण्यात येईल. तथापि कमी करण्यापूर्वी त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी

दिली जाईल.

44. ***संचालक मंडळाची गणपूर्ती होण्यास पोटनियम क्रमांक 41 (अ) मध्ये नमूद (म्हणजेच कमीत कमी 7 सदस्य संख्या) एकूण सदस्य संख्येच्या 50% पेक्षा अधिक एक सदस्य संख्या आवश्यक राहील. अशा प्रकारे गणपूर्ती झाल्यानंतर सभेचे कामकाज करता येईल. कार्यलक्षी संचालक व तज्ञ संचालकांची उपस्थिती गणपुर्तीसाठी गणना केली जाणार नाही.***

*45.* ***संस्थेच्या कोणत्याही पदाधिका-याविरुध्द अविश्वास ठराव हा अधिनियमातील कलम 73 एक - घ नुसार आणता येईल. अशा पदाधिका-यांस विहीत पध्दती अनुसरुन पदावरुन दूर केल्यास ते पद रिक्त होईल व त्याच्या जागी पदाधिका-याची फेरनिवड करण्यात येईल.***

46. ज्या संचालकाने संस्थेकडून -

(१) अनामत अगर अग्रीम रक्कम घेतली असेल, अगर

(२)कोणताही माल किंवा वस्तू उधारीवर खरेदी केल्या असतील, अगर

(३)ज्या सेवेची बिले भरावी लागतात अशा कोणत्याही सेवा घेतल्या असतील,

अशा अनामत अगर अग्रीम रक्कमा अगर माल खरेदीच्या अगर सेवेच्या रक्कमा भरण्याबद्दल संस्थेने लेखी स्वरुपात पाठविलेली नोटीस त्याला बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत रक्कम भरली नाही अगर (1) संस्थेकडून त्याला मागणीची नोटीस मिळाल्यापासून अथवा (2) त्याने अनामत अगर अग्रीम रक्कम अगर सेवा घेतल्यापासून तीस दिवसांच्या आत यापैकी जी कमी मुदत असेल त्या दिवसापासून तो ***संचालक*** म्हणून कमी झाला

व त्याची जागा रिक्त झाली असे समजण्यात येईल.

47. जर एखादा सभासद अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियमान्वये कोणत्याही प्रकारे अपात्र ठरला असल्यास तो ***संचालक*** म्हणून निवडून येण्यास, स्विकृत (को-ऑप्ट) करण्यास किंवा ***संचालक*** म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल.

48. अधिनियमातील कलम 73 गक व नियमाप्रमाणे संचालक अपात्र ठरल्यास ***संचालक मंडळावर*** संचालक म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.

49. एखाद्या ***संचालकाच्या*** त्याच्या संस्थेत असणा-या हितसंबंधाविषयी बाबींचा विचार चालू असताना ***संचालक मंडळाच्या*** त्या सभेत त्यांस हजर राहता येईल परंतु त्यांस मतदान करता येणार नाही.

50. ***संचालक मंडळ सभेची नोटीस ही कमीत कमी पूर्ण पाच दिवसांची असली पाहिजे व व्यवस्थापकाने सदरची नोटीस सर्व संचालकांना पाठविली पाहिजे. अशा सभा, अध्यक्षाच्या सूचनांनुसार व्यवस्थापकाने बोलविल्या पाहिजेत. इतर संचालकांनी मागणी करुनही संचालक मंडळाची सभा बोलविण्याच्या कामी अध्यक्षांकडून टाळाटाळ होत असेल तर सभा बोलाविण्यासाठी संचालकांनी बहुमताने दिलेली लेखी मागणी व्यवस्थापकावर बंधनकारक राहील.***

51. ***संचालक मंडळ सभेस संस्थेचे अध्यक्ष हेच अध्यक्ष म्हणून राहतील. अध्यक्ष गैरहजर असतील तेव्हा सभेस हजर असलेल्या संचालकांनी***

***आपल्यापैकी एका संचालकास त्या सभेकरिता अध्यक्ष म्हणून निवडले पाहिजे. अध्यक्षाला संचालक या नात्याने असलेल्या एका मताखेरीज समान मत प्रसंगी निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल. मात्र सदर निर्णायक मताचा हक्क पदाधिकारी निवडीचे प्रसंगी राहणार नाही.***

52. वर्षभरात संस्थेच्या कामाकरिता संचालक मंडळाच्या आवश्यक तितक्या सभा भरविल्या जातील परंतु दरमहा निदान एक तरी सभा भरलीच पाहिजे. व्यवस्थापकाने सभांचा वृत्तांत नोंदवहीत लिहून ठेवला पाहिजे.

53. ***संचालक मंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील.***

(1) सभासद होण्यासाठी व भागांसाठी आलेल्या अर्जांचा निकाल करणे.

(2) कर्जे काढणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या अटी ठरविणे.

(3) भागांच्या व येणाऱ्या इतर रक्कमांचा वसूल करणे.

(4) गरजेनुसार संस्थेच्या कामकाजाकरीता उपसमित्या नेमणे.

(5) उद्देशामध्ये नमूद केलेली सर्व कार्ये हाती घेणे. त्यासाठी तसेच सदस्यांच्या व संस्थेच्या हितासाठी आवश्यक ते करार मदार करणे.

(6) संस्थेच्या कामासंबंधी होणारा खर्च मंजूर करणे.

(7) हिशोब वेळच्या वेळी व्यवस्थापकाकडून लिहून घेणे व ते तपासणे व रोख शिल्लक मोजून पाहणे.

(8) अधिनियम कलम 75 व नियमा मधील तरतुदीनुसार वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रके वर्ष संपल्यावर 45 दिवसांत तयार करणे.

(9) *व्यवस्थापक* किंवा ओव्हरसिअर यांच्याखेरीज इतर पगारी अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या नेमणुका करणे, त्यांच्या पगाराची व भत्त्यांची श्रेणी (स्केल) व रक्कम ठरविणे अगर त्यात बदल करणे, त्यांना ताकीद देणे अगर दंड करणे वा त्यांना तात्पुरते अगर कायमचे कामावरुन दूर करणे व या सर्वबाबतीत नियम तयार करणे व ते अधिमंडळाच्या बैठकीपुढे मंजुरीस ठेवणे. सर्व कर्मचा-यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(10) कायदेशीर कामे चालविणे अगर अशी कामे चालविण्यासाठी पदाधिकारी, संचालक अगर अधिकारी यांना अधिकार देणे.

(11) आपल्या संस्थेच्या आणि सभासदांच्या गरजा अजमावून धंद्यासाठी अगर कामांसाठी लागणारी साधने व यंत्रसामुग्री खरेदी करण्याची तजवीज करणे व जरुर पडल्यास मागणी करणाऱ्या सभासदांच्या खर्चाने व त्याच्या जोखमीवर तो साठविण्याची, वाटण्याची व विकण्याची तजवीज करणे.

(12) साधने व यंत्रसामुग्री नोंदबुक तपासणे व शिल्लक माल बरोबर आहे किंवा नाही ते पाहणे.

(13) संस्था वापरीत असलेली हत्यारे, यंत्रे इत्यादी वस्तू तपासणे.

(14) संस्थेच्या कार्यालयासाठी व साधने व यंत्रसामुग्री साठविण्यासाठी जागा संपादन करणे अगर भाडयाने घेणे.

(15) संस्थेची साधने व यंत्रसामुग्री साठविण्याची जागा व संस्थेची साधने व यंत्रसामुग्री यांचे आगीपासून नुकसान होऊ नये म्हणून योग्य ती उपाययोजना करणे.

(16) ज्या व्यवस्थापक व इतर सेवकांचा रोकडीशी, साधने व यंत्रसामुग्रीशी, महत्त्वाच्या कागदपत्रांशी अगर रोख्यांशी संबंध येत असेल अशांकडून योग्य त्या रकमेचा प्रमाणानुसार जामीनरोखा घेणे.

(17) अधिनियम कलम 82 व नियम 73 मधील तरतुदींनुसार लेखापरिक्षण दोष दुरुस्ती 'ओ' नमुन्यात निबंधकाकडे पाठवणे आणि लेखापरीक्षण दुरुस्ती अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

(18) सर्वसाधारणपणे संस्थेचा व्यवहार चालविणे.

(19) सेवकवर्ग, सभासद व बिगर सभासद मजूरांना द्यावयाच्या वेतनाचे व मजुरीचे प्रमाण ठरविणे.

(20) ***संचालक मंडळ दरवर्षी आर्थिक वर्ष समाप्तीनंतर सहा महिन्यांचे आत (30 सप्टेंबरपूर्वी) त्या आर्थिक वर्षाची खालील विवरणपत्रके निबंधकाकडे दाखल करतील. तसेच ही विवरणपत्रके संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत ठेवतील.***

*1. संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाची माहिती देणारा वार्षिकअहवाल.*

*2. अहवाल वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल.*

*3. नफा वाटणी विनियोजन.*

*4. उपविधी दुरुस्तीबाबतची यादी(असलेस).*

*5. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची तारीख व संस्थेच्या निवडणूकीची तारीख.*

*6. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाची माहिती व त्याचे संमतीपत्र.*

*7. कायद्यातील तरतुदीनुसार निबंधकास आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही माहिती.*

*(8) सभासदांच्या अंतर्गत तक्रारी अथवा वाद निवारण करणेसाठी तीन जेष्ठ व अनुभवी क्रियाशिल सभासदांची तक्रार निवारण समिती नियुक्त करील. मात्र अशा समितीचे सदस्य म्हणुन विद्यमान संचालक मंडळापैकी कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही.*

(21) संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य हे क्रियाशील कसे राहतील यासाठी जरुर ती व्यवस्था पुरवून तसे सकारात्मक प्रयत्न करणे.

(22) संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी यांना कलम 24 क प्रमाणे सहकार प्रशिक्षण देणे.

## प्रकरण सहा - व्यवस्थापकाची नियुक्ती व कामे.

54. व्यवस्थापकाची नेमणूक संचालक मंडळ करेल.

55. कायदा व नियमातील तरतुदीप्रमाणे संस्थेच्या एखाद्या करारात किंवा व्यवहारात खरेदी केलेल्या अगर विकलेल्या मिळकतीत व्यवस्थापकास कसालाही भाग अगर हितसंबंध ठेवता येणार नाही.

56. व्यवस्थापकाची कामे पुढीलप्रमाणे असतील :-

(1) संस्थेच्या अधिमंडळाची बैठक व संचालक मंडळाच्या सभा बोलाविणे.

(2) अशा सभात होणाऱ्या कामांची नोंद, नोंदवहीत करणे.

(3) संचालक मंडळाच्या हुकुमाने पैसे खर्च करणे.

(4) कायदा व नियमातील नमूद केलेल्या व संस्थेने ठरविलेल्या सर्व नोंदवह्या व हिशोब पुस्तके वेळच्यावेळी लिहून अद्ययावत ठेवणे.

(5) जमा पावत्या,खर्चाच्या पावत्या(व्हाऊचर्स)व संस्थेचे काम चालविण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे तयार करणे.

(6) कायदा व नियमा प्रमाणे आर्थिकपत्रके ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करुन संचालक मंडळापुढे ठेवणे व साधारण सभेने नेमलेल्या लेखापरीक्षकांकडे पाठविण्याची व्यवस्था करणे.

(7) संस्थेचा पत्रव्यवहार चालविणे व सदस्यांना लागणारी जरुर ती माहिती वेळोवेळी पुरविणे.

(8) लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यांनतर ताबडतोब तो विचाराकरिता संचालक मंडळापुढे ठेवणे व दाखविलेले दोष व चुका दुरुस्त करण्याबाबत जरुर ती तजवीज करणे व नियमा प्रमाणे दोषदुरुस्ती संचालक मंडळापुढे ठेवून पुढे पाठविण्याची व्यवस्था करणे.

(9) संस्थेच्या पगारी सेवकांना काम नेमून देणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्यांचे नियंत्रण करणे.

(10) व्यवस्थापकाच्या गैरहजेरीत तात्पुरती कामे करण्यासाठी दुस-या सेवकांस अथवा संचालक मंडळातील एखाद्या संचालकास अधिकार देता येईल.

(11) संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य हे क्रियाशील कसे राहतील यासाठी जरुर ती व्यवस्था पुरवून तसे सकारात्मक प्रयत्न करणे.

(12) संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी यांना कलम 24 क प्रमाणे सहकार प्रशिक्षण देणे.

57. संस्था तिच्या सेवकांकरीता आवश्यकतेप्रमाणे भविष्यनिर्वाह निधी, अधिनियम 71 व नियमानुसार निर्माण करेल.

## प्रकरण सात - सभासदांची व संस्थेची जबाबदारी

58. सभासदांची व संस्थेची जबाबदारी पुढीलप्रमाणे :-

(1) संस्थेने दिलेले ओळखपत्र प्रत्येक सभासदाने स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

(2) संस्थेने प्रत्येक सभासदाची बँकेत खाती उघडली पाहिजेत व सभासदांनी केलेल्या कामाचा मेहनताना बँकेतच जमा केला पाहिजे.

(3) संस्थेने प्रत्येक सभासदाचा अपघाती विमा उतरवला पाहिजे. या विम्याचा हप्ता भरण्याची व पॉलिसी नूतनीकरणाची जबाबदारी संस्थेची राहील.

(4) संस्थेने "जिल्हास्तरावरील सहकारी संस्थांचा संघ" यांचे सभासद झाले पाहिजे व त्यासाठी संघास दरमहा संघाने ठरविलेल्या दराने वर्गणी दिली पाहिजे.

(5) सदर संस्थेने स्वत: संघीय संस्थेकडून आवश्यक असणारी कामे सभासदांच्या हितासाठी केली पाहिजे.

(6) संस्थेच्या उद्देशात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न, करार-मदार, कार्ये संस्था हितार्थ केली पाहिजे.

## प्रकरण आठ - संकीर्ण

**59.** संस्था प्रत्येक वर्षअखेरीस हिशोब तयार झाल्यावर संस्थेच्या ढोबळ नफ्यातून कलम 65 व नियम 51 मधील तरतुदींनुसार निरनिराळया खर्चाच्या वगैरे रक्कमा, कलम 71 प्रमाणे सेवक निधीसाठी संस्थेने दिलेली अंशदाने, डेडस्टॉक, यंत्रे, इमारती इत्यादी मालाचा टिकाऊपणा विचारात घेऊन त्यांच्या किंमतीवर आकारलेली झीज व तोट्याच्या रक्कमा वजा करुन संस्थेच्या निव्वळ नफयाचा आकडा काढला जाईल व तो नफा पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केला जाईल.

**60.** अधिनियमातील कलम 64 ते 69 व नियमांमधील तरतुदींना अधीन राहून निव्वळ नफ्याची विभागणी पुढील बाबींवर केली जाईल.

(1) कमीत कमी 25% रक्कम राखीव निधीसाठी.

(2) जास्तीत जास्त *15%* दराने लाभांश वाटण्याकरिता.

(3) नियमांन्वये द्यावयाच्या शिक्षण निधीकरिता.

(4) भागभांडवलाच्या 2% इतका नफा नियमाप्रमाणे उभारावयाच्या अधिलाभांश समीकरण निधीकरिता (लाभांश व अधिलाभांश समीकरण निधीचा उपयोग अनुक्रमे लाभांश व अधिलाभांश वाटण्याकडे केला जाईल)

(5) नफ्याच्या 1% तारणपत्र किंमत चढ उतार निधीकरिता.

(6) नफ्याच्या 20%पर्यंत अधिनियम कलम 59 प्रमाणे सार्वजनिक व धर्मादाय अशा प्रकारच्या कामाकरिता.

(7) नफ्याच्या 20%पर्यंत रक्कम संस्थेत काम करणाऱ्या सभासदांना अधिलाभांश वाटण्याकरिता.

(8) नफ्याच्या 20% पर्यंत सभासदांच्या भविष्यनिर्वाह निधीत जमा करण्याकरिता.

(9) नफ्याच्या 10% रक्कम भविष्य व बेकार निधीकरिता काढण्यात येईल. भविष्य व बेकार निधी संस्थेच्या व्यवहारात न गुंतविता बँकेत गुंतविला जाईल. या निधीची व्यवस्था अधिमंडळ बैठकीने केलेल्या नियमानुसार होईल. बेकार सभासदांच्या पोटगी खर्चासाठी संचालक मंडळाला बेकार निधीतून रक्कम खर्च करता येतील.

(10) वरील सर्व बाबींवर विभागून शिल्लक राहिलेला नफा पुढील बाबींवर विभागता येईल.

(11) शिल्लक नफ्याच्या 20% पर्यंत संस्थेच्या पगारी कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांच्या पगाराइतका अधिलाभांश वाटण्याकरिता.

(12) शिल्लक नफ्याच्या 10% पर्यंत संस्थेच्या सभासदांचे शिक्षण, त्यांच्यावर सुसंस्कार करणे गरिबांचे शिक्षण व त्यांना मदत, वैद्यकीय मदत व सार्वजनिक उर्पयुक्त बाबींचा प्रसार यांचा समावेश असलेल्या कोणत्याही सहकारी अगर धर्मादाय बाबीकरिता.

(13) शिल्लक नफ्याच्या 10% पर्यंत इमारत निधीकरिता.

61. निबंधकाच्या पूर्व परवानगीने अधिनियम व नियम यांतील तरतुदींना अधीन राहून अधिमंडळाच्या बैठकीस वरील नफा वाटणीच्या प्रमाणात बदल करता येईल.

62. नियमा मधील तरतुदीनुसार संस्थेने राज्य शासन जाहीर करील अशा संघीय संस्थेच्या शिक्षण निधीकरिता अंशदानाची (वर्गणीची) रक्कम भरल्याशिवाय तिला लाभांश वाटता येणार नाही.

63. संस्थेत जमा होणारी प्रवेश फी, दंड रक्कम, आदी रक्कमा राखीव निधीत जमा केली जाईल.

64. संस्थेने तिची गुंतवणूक करण्याची मुभा राहील. मात्र असे करताना सुरक्षितता, रोखता, लाभता या तत्वांचा प्रामुख्याने आधार घेतला जाईल.

65. संस्थेची रु. 500/- पर्यंतची शिल्लक व्यवस्थापकाकडे ठेवता येईल त्यापेक्षा जास्त शिल्लक जमली असल्यास ती जमल्यापासून तीन दिवसांच्या

आत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) ती बँक खात्यात भरली पाहिजे व ती भरण्याची जबाबदारी व्यवस्थापक व अध्यक्षावर राहील.

66. संस्थेचे रोखे, संस्थेच्या हिशोबाची पुस्तके व कागदपत्रे व्यवस्थापकाच्या ताब्यात राहतील व ती सांभाळण्याची जबाबदारी व्यवस्थापकावर राहील.

67. नियमा मध्ये नमूद केलेली व निबंधकांनी ठरविलेली व संचालक मंडळास आवश्यक वाटतील अशी हिशोबाची पुस्तके व कागदपत्रे संस्थेने ठेवली पाहिजेत. त्या पुस्तकांवर व कागदपत्रांवर जरुर तेथे व कीर्दीवर दररोजच्या व्यवहाराच्या शेवटी अध्यक्ष व व्यवस्थापकाने सहया केल्या पाहिजेत. अध्यक्ष व व्यवस्थापक हे संस्थेच्या कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कलांवर सहया करतील. या व्यतिरिक्त दुसऱ्या अधिकाऱ्यांनी कागदपत्रांवर सहया करावयाच्या असल्यास त्यांना त्या करण्यासाठी संस्थेस अधिकार देता येईल.

68. संस्थेत आलेल्या ठेवीच्या, कर्ज फेडीच्या व रक्कमांच्या ठराविक नमुन्यातील जमेच्या पावत्या सहया करुन दिल्या पाहिजेत.

69. पासबुके फक्त सभासदांना देण्यात येतील. त्यात सभासदाकडून आलेल्या व त्यास दिलेल्या रक्कमांच्या नोंदी केल्या जातील व त्या प्रत्येक नोंदीच्या खरेपणाबद्दल व्यवस्थापकाने सही केली पाहिजे. त्याने सभासदांची पासबुके नेहमी लिहून पूर्ण केलेली असली पाहिजेत.

70. संस्थेच्या कोणत्याही सभासदाला अधिनियम कलम 32 मधील तरतुदीनुसार व त्यात नमूद केलेली संस्थेची पुस्तके पाहता येतील. अगर नियम 27 मधील तरतुदीनुसार त्याच्या नक्कला त्यास देता येतील. तसेच त्यांनी

संस्थेशी केलेल्या व्यवहाराबाबत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत संस्थेशी त्याचे झालेले व्यवहार पाहता येतील.

71. संस्थेच्या उपविधीत बदल करणे, एखादा उपविधी रद्द करणे किंवा नवीन उपविधी करावयाचा असल्यास कलम 13 व नियम 12 मधील तरतुदी अनुसरल्या जातील. त्याकरिता भरलेलया अधिमंडळाच्या बैठकीस हजर असणाऱ्या व मत देणाऱ्या सभासदांच्या निदान दोन तृतीयांश संख्येने त्या बदलासंबंधीचा ठराव पास केला पाहिजे. त्या बैठकीची नोटीस बैठकीच्या तारखेपूर्वी निदान ***चौदा*** दिवस अगोदर सर्व सभासदांना दिली पाहिजे. कोणता उपविधी कसा बदलावयाचा, कोणता नवीन स्वीकारावयाचा अगर रद्द करावयाचा हे त्या नोटीशीत स्पष्टपणे लिहिले पाहिजे. निबंधक यांच्याकडून दुरुस्तीस मान्यता व त्याची नोंद होईपर्यंत दुरुस्त केलेला उपविधी अमंलात आणता येणार नाही.

72. सभासदांस नोटीस दिली पाहिजे असे या उपविधीत जेथे नमूद केले असेल तेथे, सभासदांच्या दिलेल्या पत्यावर अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीशीची योग्य बजावणी झाली असे समजले जाईल.

73. संस्थेचा शिक्का :-

अधिनियम कलम 36 प्रमाणे संस्थेचा एक सामाईक शिक्का (सिल) असेल व तो व्यवस्थापकाच्या ताब्यात राहील व त्याचा वापर संचालक मंडळाच्या ठरावाच्या अधिकारान्वये होईल.

प्रवर्तकांचे/संचालकांचे नाव - सह्या

| | |
|---|---|
| १) श्री. संजय अ. लोणकर | 1) S. Lonkar |
| २) सौ. विद्या सं. लोणकर. | 2) V. S. Lonkar |
| ३) श्री. स्वप्नील सु. डाके | 3) |
| ४) सौ. उषा प्र. माडांगे | 4) उषा |
| ५) श्री. संतोष वा. पगारे | 5) |
| ६) श्री. मंगेश मि. येवले. | 6) |
| ७) श्री. प्रविण शे. मोरे. | 7) |
| ८) श्री. वामन पगारे. | 8) वामन पगारे |
| ९) श्री. सुनिल के. वारगे. | 9) |
| १०) श्री. सियाराम मे. चौधरी. | 10) चौधरी |
| ११) श्री. उमेश सु. कोळेकर. | 11) |
| १२) | 12) |
| १३) | 13) |

दिनांक :२५/०८/२०१३

ठिकाण :- मुंबई.

स्वामी समर्थ सेवा सहकारी संस्था मर्या.

S. Lonkar. V. S. Lonkar.

अध्यक्ष सचिव खजिनदार

( मुख्य प्रवर्तकांनी संस्थेच्या प्रकारनिहाय उद्देश व अन्य शिर्षकाखालील लागू नसणारा मजकूर खोडावा.)

या कार्यालयाकडिल ज्ञापन क्रमांक

मुंबई/जि.उ.नि(२)/पो.नि.दु./बी-२/ ३९०४ /सन २०१३

दिनांक १८/१०/२०१३ अन्वये मंजूर

जिल्हा उपनिबंधक,

सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई.

नमुना इ-९ E ९

[ नियम ३२ पाहा ]

बिनविरोध निवडणुकीच्या निकालाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

# स्वामी समर्थ सेवा सहकारी संस्था मर्यादित,

## अे ७०४, ग्रीट हाईटस, गोवंडी, मुंबई ४०००४३.

---

## सन २०२२ ते २०२७ या कालावधीसाठीची निवडणूक

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ यातील नियम ३० मधील तरतुदींना अनुसरून, मी घोषित करतो की, खालील नमुद केलेले उमेदवार त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले आहेत कारण त्या जागेसाठी ते एकच उमेदवार होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पत्ता | मतदार संघाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | संजय अशोक लोणकर | अे ७०४, ग्रीट हाईटस, मानखुर्द-घाटकोपर लिंक रोड, गोवंडी, मुंबई ४०००४३. | सर्वसाधारण |
| २ | स्वप्नील सुरेश डाके | ११८/१०, संत ज्ञानेश्वर नगर, येरगाव,पुणे शहर पुणे ४११०३३ | सर्वसाधारण |
| ३ | नेहा नितीन मटकर | ओंकार क्लिनीक, सिताई नगर, मांजरी फार्म ता. हवेली, जि. पुणे | सर्वसाधारण |
| ४ | माधवी मिलिंद मटकर | ई-२०५, डी.एस.के. विदयानगरी, पाषाण सूसरोड, बाणेर, पुणे | सर्वसाधारण |
| ५ | उषा प्रदिप भडांगे | रूम नं.४२, चाळ नं.११, भीम गर्जना मित्र मंडळ, लिंबोनी बाग, गोवंडी, मुंबई ४०००४३. | सर्वसाधारण |
| ६ | जीतेंद्र वल्लभभाई पटेल | रूम नं.८९, सहयाद्री नगर, पंतनगर, ९० फीट रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७. | सर्वसाधारण |
| ७ | विदया संजय लोणकर | अे ७०४, ग्रीट हाईटस, मानखुर्द-घाटकोपर लिंक रोड, गोवंडी, मुंबई ४०००४३. | महिला राखीव |
| ८ | पद रिक्त | | महिला राखीव |
| ९ | पद रिक्त | | अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती |
| १० | पद रिक्त | | इतर मागासवर्गीय |
| ११ | पद रिक्त | | विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासवर्गीय प्रवर्ग |

मी असे देखील प्रमाणित व घोषित करतो की, वरील उमेदवार संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या त्या त्या जागांवर यथोचितरित्य निवडून आलेले आहेत.

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०१/०५/२०२२

[निवडणूक निर्णय अधिकारी, सन २०२२ ते २०२७ — stamp]

(अतुल विनायक मोरे)

प्राधिकृत अधिकारी,

स्वामी समर्थ सेवा सहकारी संस्था मर्यादित